www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक
# युवक आधार
मराठी





मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 285 वा रविवार दि. 29 जून २०२५ किंमत : 2 रु पृष्ठ : ४

# तक्का येथील फुटपाथवर आढळले बास्केटमध्ये ठेवलेले नवजात अर्भक

**नवजात मुलीच्या भवितव्याच्या अनुषंगाने योग्य ती पावले उचलणार - आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही**









**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
पनवेल शहरातील तक्का परिसरात आज सकाळी एक मन हेलावून टाकणारी घटना उघडकीस आली. मुलींच्या बालगृहाबाहेर फुटपाथवर एका बास्केटमध्ये ठेवलेले नवजात अर्भक आढळून आले, त्यासोबत इंग्रजी भाषेत एक चिठ्ठी सापडली असून बाळाला सांभाळण्यास असमर्थ असल्याचे या चिठ्ठीतून पालकांनी म्हटले आहे. तर या मुलीच्या भवितव्याच्या अनुषंगाने योग्य ती पावले उचलली जातील, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली आहे. आज सकाळी तक्का परिसरातील नागरिकांना एका बास्केटमधून बाळाच्या रडण्याचा आवाज आला. येथील नागरिकांनी आवाजाच्या दिशेने जाऊन पाहिले असता, त्यांना बास्केटमध्ये एक नवजात बाळ दिसले. नागरिकांनी क्षणाचाही विलंब न लावता तात्काळ पनवेल शहर पोलिसांना या घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक व पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे अधिकारी अभिजीत भवर आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी बाळाला ताब्यात घेऊन उपचारासाठी पनवेलच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. **पान २ वर**

सर्व देशवासीयांच्या दृष्टिकोनातून अतिशय चिंताजनक आणि हृदयद्रावक अशी हि घटना आहे. बाळ अशा पद्धतीने सोडून दिले जाणे विशेषत्वाने ते बाळ एक मुलगी आहे असे समजते त्या वेळेला आपल्या सर्वांची आणखी चिंता वाढवणारी हि घटना आहे. नवजात बाळाचा त्याग करावा असे बाळाच्या आईवडिलांना का वाटावा?. काय त्यांची मनोवृत्ती आहे हे कळायला मार्ग नाही. नेमके कारण काय आहे हे कळत नाही. हे बाळ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलीस तपासात कारण निष्पन्न होईलच. आरोग्याच्या दृष्टीने बाळाची रुग्णालयात तपासणी झाली पुढे अलिबाग येथे तपासणी होणार आहे. जर तब्येतेची कारण आहे किंवा काहीही इतर कारण असले तरी अशा बाबतीत समाज मदत करत राहतो. आता जोपर्यत बाळाच्या आई वडिलांचा शोध लागत नाही तोपर्यंत आणि आवश्यकता आहे तो पर्यंत समाज निश्चित पुढे येऊ शकतो. या बाळाच्या भविष्याच्या दृष्टिकोनातून व्यक्तिशः मी आणि आमचे सर्व सहकारी जी काही आर्थिक बाजू उचलायची आहे ती आम्ही नक्कीच उचलू. तसेच या संदर्भामध्ये मी पोलिसांशी समन्वय करणार असून या बाळाचा सांभाळ, उपचार करण्याच्या दृष्टिकोनातून जे काही आमच्याकडून करता येईल ते मी करेन. या मुलीच्या भवितव्याच्या अनुषंगाने योग्य ती पावले उचलली जातील.

**- आमदार प्रशांत ठाकूर**

आम्हाला कॉल आला कॉल आल्यानंतर सांगण्यात आलं की एक लहान बाळ फुटपाथ वर ठेवण्यात आलेला आढळून आलेला आहे क्षणाचा विलंब न करता मी तिथे पोहोचलो नवजात बाळ पाहताच लगेचच महानगरपालिका वरिष्ठ अधिकारी व पोलीस अधिकारी यांना कळवले त्वरित जिल्हा उप रुग्णालयात घेऊन गेलो. ही घटना मनाला धक्का देणारी आहे हे कृत्य करणाऱ्यांना कठोर कारवाई व्हावी

अभिजीत भवर
आरोग्य विभाग अधिकारी
पनवेल महानगरपालिका

## 29 जून रोजी जॉब इंटरव्यूचे आयोजन

### "रोजगारासाठी भाजपचा पुढाकार"

दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी
पनवेल, नवी मुंबई, मुंबई परिसरामध्ये नोकरीच्या अनेक संधी तरुणांसाठी उपलब्ध आहेत. त्याचेच एक पाऊल म्हणून भारतीय जनता पार्टी प्रितम जनार्दन म्हात्रे जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून 29 जून रोजी जॉब इंटरव्यूचे आयोजन करण्यात आले आहे. 29 जून रोजी सकाळी दहा ते तीन वाजेपर्यंत जॉब इंटरव्यूचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी बायकर, बॅक ऑफिस, ऑपरेशन स्टाफ, पिकर पॅकर, फिल्ड ऑडिटर, डिलिव्हरी एक्झिक्यूटिव्ह, सपोर्ट स्टाफ, व्हॅन बॉय, काउंटर स्टाफ इन्स्टॉलर /हेल्पर, फार्मासिस्ट या पदासाठी जॉब इंटरव्यू होणार आहे. पनवेल शहरातील भारतीय जनता पार्टी प्रितम जनार्दन म्हात्रे जनसंपर्क कार्यालय, गुरु शरणम कॉम्प्लेक्स, विश्राळी नाका, मार्केट यार्ड येथे या जॉब इंटरव्यूचे आयोजन करण्यात आले आहे.

आपल्या परिसरात विकासासोबतच नव्याने उद्योगधंदे येत आहे त्याप्रमाणे रोजगार सुद्धा वाढत आहे. यावेळी आपल्या विभागातील तरुणांना संधी मिळावी या उद्देशाने आम्ही भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून पुढाकार घेतला आहे.

**प्रितम जनार्दन म्हात्रे**
**मा.विरोधी पक्षनेते**
**पनवेल महानगरपालिका**




## दृष्य सत्य

**जनतेच्या नजरेतून**
**शासनाच्या दरबारात**

**कचऱ्याचा डोंगर – दत्तनगरच्या आरोग्यावर घाला!**

**नागरिकांचा सवाल:**
"आम्ही कर भरतो, आरोग्याच्या बदल्यात कचऱ्याचे ढिग आणि डुकरांची दहशत का?"




**स्थान: मुरुड, दत्तनगर – वॉर्ड क्र. १**
**प्रतिनिधी: मोहम्मद पिंजारी, लातूर**

**फोटोतून शासनदरबारी आवाज पोहोचवत आहेत दैनिक व आधारचे पत्रकार मोहम्मद पिंजारी**

"दत्तनगरच्या मुख्य रस्त्यालगत ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढिग व डुकरांचा वाढता वावर ही केवळ घाण नव्हे, तर नागरिकांच्या आरोग्यावरचा गंभीर आघात आहे! डास, दुर्गंधी आणि संसर्गजन्य रोगांच्या छायेत जगणारे नागरिक प्रशासनाकडून केवळ 'बघ्याची भूमिका' अनुभवत आहेत."

**प्रशासन जागे होईल तेव्हा होईल... पण तोपर्यंत ही सत्य दृश्यं शासनाच्या दरबारात पोहोचवणे हीच आमची जबाबदारी.**

## तक्का गावाजवळ फूटपाथवर आढळले नवजात बाळ – अभिजीत भवर यांच्या प्रसंगावधानामुळे जीव वाचला

### आरोग्य विभागाचे निरीक्षक अभिजीत भवर यांनी वेळेवर हस्तक्षेप करत नवजात बाळाचे प्राण वाचवले – नागरिकांकडून कौतुकाचा वर्षाव

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**
पनवेल जवळील तक्का गावाजवळ एक नवजात बाळ फूटपाथवर आढळून आले. पनवेल महानगरपालिके आरोग्य निरीक्षक अभिजीत भवर तिथून जात असताना ही धक्कादायक घटना पाहताच अभिजीत भवर यांनी प्रसंगावधान राखत त्वरीत पावले उचलली लगेचच नागरिकांच्या मदतीने जवळ असलेल्या सिद्धी हॉस्पिटल येथे नवजात बालकाला घेऊन गेले बाल सुखरूप असल्यास ते समजतात त्वरित पालिका अधिकारी व पोलीस प्रशासनाला कळवले पोलीस अधिकाऱ्यांना ही बातमी कळताच तातडीने घटनास्थळी पोहोचले अभिजीत भवर
त्यांच्या तत्परतेमुळे आणि योग्य वेळी केलेल्या मदतीमुळे बाळाला त्वरित वैद्यकीय उपचार मिळाले आणि सध्या त्याची प्रकृती स्थिर असून सदर बाळा ला बाल आश्रम अलिबाग येथे पाठवण्यात आले.अनेकांनी या धाडसी व संवेदनशील कृतीसाठी अभिजीत भवर यांचे अभिनंदन केले आहे. स्थानिक पातळीवर त्यांना "बाळ वाचवणारा हिरो" म्हणून गौरवले जात आहे.









## नवजात मुलीच्या भवितव्याच्या अनुषंगाने योग्य ती पावले उचलणार - आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही

**पान १ वरून** सध्या बाळाची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे. या चिठ्ठीतून बाळाच्या पालकांची बिकट मानसिक आणि आर्थिक परिस्थिती समोर आली आहे. मात्र, अशा प्रकारे बाळाला सोडून देणे हा गंभीर गुन्हा असल्याने, पनवेल शहर पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. बाळाच्या पालकांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू करण्यात आला असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

बास्केटमध्ये बाळासोबत एक इंग्रजीत लिहिलेली चिठ्ठी सापडली, ज्यामुळे या घटनेला एक भावनिक वळण मिळाले आहे. या चिठ्ठीत लिहिले आहे की..

"प्रिय सर/मॅडम, आम्हाला हे करावे लागले यासाठी आम्ही मनापासून माफी मागतो. आमच्याकडे दुसरा कोणताही पर्याय नव्हता. आम्ही या बाळासाठी मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या काहीही करू शकत नाही. कृपया या प्रकरणात कोणालाही गुंतवू नका किंवा प्रकरण वाढवू नका. आम्हाला जे काही सहन करावे लागत आहे, ते या बाळाच्या नशिबी येऊ नये अशी आमची इच्छा आहे. आम्ही तुम्हाला विनंती करतो की तिची काळजी घ्या. आशा आहे की एक दिवस आम्ही तिला परत घेऊ." कारण आम्ही तिच्या जवळच आहोत. आम्ही दिलगीर आहोत."

# पंढरपूर जाणारे वारकऱ्यांना जगताप कॉफी सेंटरच्या वतीने, थंड पेय व केळी वाटप

### हभप महंत काशिनाथ महाराज यांचे स्वागत


**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी**
**मारुती सत्रे**




आष्टी येथील"जगताप बेकर्स, कॉफी अँड डेअरी फार्मच्या वतीने गणेश गड नागतळा ते पंढरपूर पायी दिंडी जाणाऱ्या वारकऱ्यांना थंड पेय व केळी वाटप करण्याची सेवा केली आहे.याप्रसगी ह.भ.प. महंत काशिनाथ महाराज यांचे संचालक शुभम जगताप,शिवराज कोकणे व आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम,अक्षय भोसले यांनी स्वागत केले. ही पायी दिंडी (वारी) भक्त पालखी, कीर्तन मंडळी आणि हजारो वारकऱ्यांच्या समूहासह नागतळा ते पंढरपूर (विठ्ठल मंदिर) या मार्गाने जाते. या प्रवासादरम्यान वारकऱ्यांना अन्न-पाणी, छाया, आरामाची सोय, औषधी सेवा इत्यादी देण्यासाठी अनेक संस्था, व्यावसायिक आणि भक्त सेवेचा हेतूने मदत करतात. या अनुषंगाने आष्टीतील जगताप बेकर्स, कॉफी अँड डेअरी फार्मच्या वतीने धार्मिक यात्रेला सामाजिक जबाबदारी म्हणून पाठिंबा देत आहे. त्यांच्या वतीने केले जाणारे वाटप थंड पेय व केळी हे भक्तांना ऊर्जा आणि उत्साह देण्यासाठी असते. धार्मिक समुदायाला सहाय्य करणे आणि सामाजिक सेवेची संस्कृती जिवंत ठेवणे गरजेचे आहे. यावेळी एन टी गर्जे, सर्जेराव तांबडे, विश्वनाथ गर्जे, रंगनाथ सानप, बाळू पालवे, ज्ञानदेव गर्जे, शेषेराव गर्जे,ननवरे सर, कृष्णा मिसाळ, शिवाजी शेकडे, उमेश तांदळे, प्रसाद खंडागळे, विनायक साबळे, ओमकार कोकणे, गणेश वाल्हेकर आदी उपस्थित होते.

## आठवडी बाजारात फिरत असलेल्या चोरट्यास अटक

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**



**राळेगाव** :- येथील शुक्रवार ला भरणाऱ्या आठवडी बाजारात तसेच बसस्थानक परिसरात संशयास्पदरित्या वावरत असलेल्या तीन इसमास दि.२७ जून २०२५ रोजी राळेगाव पोलिस पथकाने पकडले आहे. राळेगाव शहरात दर शुक्रवारी भरणाऱ्या आठवडी बाजारात मोबाईलचे तसेच पैसे चोरीच्या घटना दिवसेंदिवस वाढत असताना शुक्रवारी बाजाराच्या दिवशी

आठवडी बाजारात मोबाईल चोरीच्या पैसे चोरीच्या घटनांतील दिवसेंदिवस वाढ होत असल्याने राळेगाव च्या नवनियुक्त ठाणेदार शितल मालटे मार्गदर्शनात ए एस आय गोपाल वास्टर एन पि सी विशाल कोवे,पि सी सूरज गावंडे आठवडी बाजारात बंदोबस्त ड्यूटी लावली होती त्यांना संशयास्पद रित्या सायंकाळी पाच वाजताच्या दरम्यान आठवडी बाजार बस स्थानक परिसरात सदर इसम (१) समीर शब्बीर पठाण वय (२०) वर्ष रंगनाथ नगर,वणी (२) अर्जुन गोपाल आडे वय(२०)वर्ष खरवडा मोहल्ला, वणी (३)रोहित गोपाल आडे वय(१९) वर्ष खरवडा मोहल्ला हे आढळून आले असून हे तीनही इसम चोरीसारखे हस्तक्षेपनीय गुन्हा करण्याच्या उद्देशाने संशयितरित्या फिरत असताना मिळून आले असून त्यांच्या विरुद्ध पोलीस स्टेशनला कलम १२८ बी एन एस एस अन्वये कारवाई करण्यात आली आहे पुढील तपास पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनात गोपाल वास्टर विशाल कोवे,सुरज गावंडे यांनी केली आहे

# बोगस जातवैधता प्रमाणपत्राची तपासणी करून त्याच्यावर कारवाई करावी

### १२५०० आदिवासी अधिसंख्य पदभरती मोहीम तात्काळ सुरू करणाऱ्यात यावी

### आदिवासी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्याकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**राजू गायकवाड**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी**



मा. सर्वोच्य नायालयाने दिलेल्या 6 जुलै 2017 रोजीच्या निकालानुसार शासकीय कर्मचाऱ्यांनी बोगस आदिवासी जात वैध्यता प्रमाणपत्र सादर केलेल्यांवर बडतर्फची कारवाई करून त्या जागेवर तात्काळ मूळ आदिवासी युवकांची पदभरती करावी. शासनाने आजपर्यंत बहुतांश शासननिर्णय काढले परंतु त्यांची अंमलबजावणी आजपर्यंत कधीच केली गेली नाही काही शासन निर्णय आणि त्याचे सांकेतांक क्रमांक आणि न्यायालयाचे आदेश क्रमांक आहेत

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. बीसीसी- २०११ प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब दि.१२/१२/२०११ तसेच मा. सर्वोच्च न्यायालय सिव्हिल अपील क्र.८९२८/२०१५ व इतर याचिका यामधे दि. ६ जुलै २०१७ रोजीचा दिलेला निर्णय त्यानंतर मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर यांची रिट याचिका क. ६२४७/२०१५ मध्ये दि. ०१.०२.२०१८ रोजी दिलेला निर्णय अशे एकूण 7 निर्णय आजपर्यंत झाले परंतु अद्याप यावर कोणीही कारवाई केली नाही. महाराष्ट्र सरकारतर्फे ८५ हजार पदभरतीचे सर्व शासकीय विभागाला आदेश दिले गेलेले आहेत आणि सद्य परिस्थिती विविध पदांची सरळसेवा भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे त्याकरिता ड प्रवर्ग साठी जातवैधता बंधनकारक करण्यात यावे व मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार अधिसंख्य अनुसुचित जमाती विशेष पदभरती मोहीम सुरू करावी अशी मागणी आदिवासी युवकांनी माननीय राज्यमंत्री इंद्रनीलभाऊ नाईक यांच्याकडे केले आहे . अँड सुनील ढाले, प्रकाश मोरे, राजू गायकवाड,राजेंद्र भाकरे,भूषण अंभोरे संदीप माने,पंकज वंजारे,प्रमोद आमले,शंकर डाखोरे,आकाश फुपरे, शंकर डाखोरे, सुनील, चिरंगे,संजय पाचपुते,नागनाथ तोरकड,रवी धुमाळे, पांडुरंग भांगे,विश्वनाथ नांदे,ओंकार भोकरे आकाश काळे,रामदास बुरकूले,सुखदेव भुरके,सुरज गेडाम,विजय भोकरे,अमोल सरकुंडे,रवी धुमाळे,आकाश रिठे,संतोष इंगळे,अर्जुन वाघमारे,सुनील चिरंगे,अरुण दुम्हारे,राजेश काळे, परमेशवर सरकुंडे,प्रशांत इंगळे,उपस्थित होते.

## कैलास भाऊ देशमुख गोरठेकर परिवाराकडून दिव्यांग तरुणाला व्हील चेअर मदतीचा हातभार

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** - उंमरी शहरातील दिव्यांग हनुमान ठाकूर यांना काही दिवसापूर्वी दुर्घटनेमुळे त्यांचा एक हात व एक पाय अवयव निकामी झाले होते त्यांना बाहेर जगात हिंडता फिरता येत नव्हतं त्या त्या ठाकूर चे आई-वडील आपला उद्धार निर्वाह करून जगत होते परंतु त्या हनुमान ठाकूर या युवकास घराबाहेर पडणे फार अवघड होते ही बाब कळताच कैलास भाऊ देशमुख गोरठेकर नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक तथा नायगाव मतदारसंघाचे युवा नेतृत्व व कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती श्री शिरीष भाऊ देशमुख गोरठेकर, यांच्या विचाराने त्या युवकास त्या कसल्याच प्रकारचा विलंब न लावता स्वखर्चातून त्यांना ताबडतोब व्हिलचेअर खरेदी देऊन त्या ठाकूर युवकाला आपल्या मार्केटमध्ये उधार निर्माण साठी बाहेर निघाला, त्या ठाकूर परिवाराला व त्या स्वतःला त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण निर्माण झाले या अगोदर कै. बापूसाहेब देशमुख गोरठेकर या मतदारसंघाचे नेतृत्व करत असताना गोरगरीब पददलित ,दिन दुबळे, लुळे पांगळे अंध अपंग दिव्यांग या सर्व घटकातील दिव्यांगाना मधील मदतीचा हात देत होते, म्हणून आज त्यांचे चिरंजीव कैलास भाऊ देशमुख गोरठेकर, व शिरीष भाऊ देशमुख गोरठेकर, ह्या समाजाचा देण आहोत ही भूमिका मनी ठेवून आपल्या आई-वडिलांचे भूमिका डोळ्यासमोर ठेवून आज त्या हनुमान ठाकूरला मदतीचा हात दिला अशीच सेवा दिव्यांगाला पदोपदी घडत राहो ती परंपरा कायम आहे त्याप्रसंगी सदानंद मंत्रीवाढ, राजू रोकडेवार,नागेश बठेवाड पत्रकार,मंगेश डोमपलवार, अमित भाऊ पटकूटवार ,या सर्व मित्र परिवार उपस्थित होते त्यांना व्हिल्चर भेट दिली त्या दिव्यांगा जगण्याचा आधार दिला



## युवा ग्रामीण पत्रकार संघटना खेड तालुका अध्यक्ष पदी श्री. हंसराज पाटील यांची नियुक्ती.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी: संतोष लांडे**



चाकण :ग्रामीण पत्रकारितेत आणि सामाजिक कार्यात सक्रीय भूमिका बजावणारे आणि सातत्याने सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे श्री. हंसराज पाटील यांची "राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघ" खेड तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.ही निवड संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. गणेश कचकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मा. गणेश महाडिक यांच्या उपस्थितीत आणि मा. कांताभाऊ राठोड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी संतोष लांडे (विभागीय अध्यक्ष),श्री.गोपाळ भालेराव पुणे जिल्हा उपाध्यक्ष ग्रामीण सतीश कुमार कोकरे (हवेली तालुका अध्यक्ष), अमित मोरे (हवेली तालुका उपाध्यक्ष), संतोष सातकर, पुणे जिल्हा उपाध्यक्ष आदी मान्यवर उपस्थित होते.

नवीन नियुक्तीच्या निमित्ताने श्री. हंसराज पाटील यांना परिसरातील पत्रकार तसेच सामाजिक कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुढील काळात ग्रामीण भागातील पत्रकार बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि त्यांच्या हितासाठी सक्रीय काम करण्याचा निर्धार श्री. हंसराज पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.आणि वरील सर्व पदाधिकारी यांचे आभार मानले.

# निफाड पूर्व भागातील अतिक्रमणग्रस्त शिवरस्ते मोकळे करण्यासाठी मोजणीस प्रारंभ; पोलीस बंदोबस्तात कार्यवाही

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**




> शिवरस्ते मुक्त झाल्यानंतर गावातील नागरिकांना शेतीसाठी रस्ता उपलब्ध होईल, तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले वाद सुटण्यास मदत होईल.
> **मा.विशाल नाईकवाडे**
> **तहसीलदार**

**विंचूर** :- जिल्हाधिकारी नाशिक यांच्या निर्देशानुसार व भूमी अभिलेख विभागाच्या मार्गदर्शनाखाली निफाड तालुक्यातील विविध गावांमधील गांवनकाशानुसार अस्तित्वात असलेले परंतु अतिक्रमणामुळे बंद झालेले शिवरस्ते मोकळे करण्यासाठी प्रशासनाने पावले उचलली आहेत. या अनुषंगाने दिनांक निश्चित करून शिवरस्त्यांची मोजणी व हद्दी खुणा निश्चित करण्याची कार्यवाही पोलीस बंदोबस्तात पार पडणार आहे.

जिल्हाधिकारी नाशिक यांच्या दिनांक १८ डिसेंबर २०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार, गांव नकाशानुसार अस्तित्वात असलेले गाडी रस्ते, पाणंद, पांधण, शिवाररस्ते, शेतावर जाण्याचे पायवाट यांची अतिक्रमणातून मुक्तता करून, ग्रामस्थांच्या शेतीस व गावात ये-जा करण्याच्या मार्गांना मोकळे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अंतर्गत निफाड तालुक्यातील देवगाव, कोळगाव, वाकद, शिरवाडे वाकद, मुखेड, अंजनपूर, पिंपळस, टाकपूर, पिंपळगाव, खेडे आदी गावांतील एकूण १० शिवरस्त्यांची मोजणी व सीमा निश्चिती करण्यात येणार आहे. त्यात देवगाव ते मानोरी खुर्द, देवगाव ते मुखेड, कोळगाव ते कानळद, वाकद ते शिरवाडेवाकद अशा महत्त्वाच्या मार्गांचा समावेश आहे. या मोजणी कार्यवाही दरम्यान संभाव्य वाद व कायदा-सुव्यवस्थेचा विचार करून तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी संबंधित पोलिस ठाण्यांना आवश्यकतेनुसार पोलीस व महिला पोलीस बंदोबस्त पुरविण्याच्या सूचना दिल्या आहेत. शिवाय, ग्रामस्तरावरील महसूल अधिकारी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, व रस्ता समिती सदस्यांना मोजणी दिवशी उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## सरपंच सुधीर जवादे (पाटील) यांनी विडीओ कॉन्फरन्स द्वारे चर्चा करून विकसित महाराष्ट्र २०४७ चे व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्य सचिव आणि शासनास आवश्यक सूचना केल्या

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**



राळेगाव:-महाराष्ट्र शासनाने २०४७ करिता महाराष्ट्राचे शहरीकरण करायचे की ग्रामीण विकास करायचा हे प्रथम निश्चित करावे कारण यापुढे खेडी ओस पडणार आहे खेडे गावात राहायला सर्वसाधारण लोक तयार नाही,महाराष्ट्र शासनाने ७३ वी घटनादुरुस्ती पूर्णपणे लागू करून पंचायतराज संकल्पना राबवून सत्तेचे विकेंद्रीकरण करावे.केरळच्या धरतीवर पंचायतराज संकल्पना जनतेपर्यंत पोहोचवून सत्ता जनतेच्या हातात द्यावी. लोक स्वतःवरून विकास करतील,परंपरागत व्यवसाया व्यतिरिक्त म्हणजे कोंबडे बकरे गाई म्हशी ग्रामीण भागासाठी हेच उद्योग का बर सुचवता ?याच्याऐवजी परवाना धारक उद्योग आहे ते द्यावे,पेट्रोल पंप,अन्य काही उद्योग व्यवसाय आहे ते स्थानिक नागरिकांना प्राधान्याने द्यावे तेव्हा गावकरी विकसित होतील व ग्रामीण विकास होईल,पंचायत समिती पासून जिल्हा परिषद आमदार खासदार विधान परिषद सदस्य राज्यसभा सदस्य एवढेच काय,राष्ट्रपती पर्यंत ज्या काही निवडणुका होतील त्यांना किमान ग्रामपंचायत सदस्य असणे,शहरात वार्ड मेंबर असणे ची अट लागू करणे गरजेचे आहे त्याशिवाय गावाकडे कोणी लक्ष देणार नाही.जिल्हा नियोजन समिती सरपंचाचे प्रतिनिधी असावे कारण शेवटी विकास गावाचा करायचा आहे तसेच डीपीडीसी मध्ये सरपंच नसतो तेव्हा सरपंचाचा प्रतिनिधी असणे गरजेचे आहे,महसूल विभागवार सरपंच मधून आमदार असावा जसा शिक्षक आमदार असतो पदवीधर आमदार असतो त्याची गरज आज कालबाह्य झालेले आहे पण सरपंच आमदार असणे गरजेचे आहे, वातावरण बदल,पर्जन्यमान मध्ये अनियमितता,ऑक्सिजन निर्मिती यासारख्या विषयावर नियोजन करणे गरजेचे आहे,२०२९ पर्यंत ची एक पंचवार्षिक योजना संपूर्णपणे शेत पांधण रस्ते ग्रामीण रस्त्यासाठी राबवावी व एकदाचा हा प्रश्न निकालात लावावा,शेतकऱ्यांची जमीन रस्त्यात घेतली तर त्यांना नवीन कायद्यानुसार मोबदला द्यावा,निर्णय प्रक्रियेमध्ये लोकांना सहभागी करून घेण्यात यावे,देशातील जनतेला विशेषतः ग्रामीण भागातील जनतेला निर्णय प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घ्यावे, पंचायतराज व ग्रामीण विकास यावर अभ्यासक्रम ठेउन,त्यांचे शिक्षण घेतलेल्या व्यक्तीच जनतेतून सरपंच साठी पात्र असावी अशा सुचना महाराष्ट्र शासनास करण्यात आल्या आहेत.

**सुधीर जवादे(पाटील)**
**सरपंच, कीन्ही जवादे**
**ता.राळेगांव जिल्हा यवतमाळ**

## श्री योगानंद माध्यमिक विद्यालय परतुर येथे अमली पदार्थविरोधी दिन व राजश्री शाहू महाराज जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय संपादक**
**प्राचार्य जगन्नाथ रासवे.**



दि २६/०६/२०२५ रोजी श्री योगानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आमली पदार्थ विरोधी दिवस व राजश्री शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी दिवाणी न्यायाधीश परतुर श्रीमती डोंबे मॅडम, विद्यालयाचे प्राचार्य श्री मोगल सर, पर्यवेक्षक श्री थोरवे सर, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू भगिनी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

दिवाणी न्यायाधीश श्रीमती डोंबे मॅडम यांनी विद्यार्थी युवकांना जीवनामध्ये सक्षम कसं बनवायचं, आरोग्याची कशी काळजी घ्यावयाची, व्यसनापासून कसं दूर राहावयाचे याविषयी मार्गदर्शन केले. पुढे बोलताना न्यायाधीश श्रीमती डोंबे मॅडम यांनी राजश्री शाहू महाराजा विषयी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा विद्यार्थ्यांना दिला. राजश्री शाहू महाराजांचे गुण व विचार आपण आपल्या जीवनात अंगीकारले तर आपलं जीवन समृद्धी झाल्याशिवाय राहणार नाही असंही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिगांबर लिपणे सर यांनी केले तर आभार विद्यालयाचे पर्यवेक्षक थोरवे सर यांनी मानले.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## सणसरमध्ये मुस्लिम समाजाकडून वारकऱ्यांची मिठाई वाटून सेवा

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर येथे संत तुकाराम महाराज पालखीचा पहिला मुक्काम असतो आणि येथील मुस्लिम बांधव यादिवशी एकत्र येऊन तयार करण्यात आलेला मुस्लिम सामाजिक विकास चॅरिटेबल ट्रस्ट सणसर यांच्यावतीने गेल्या पंधरा वर्षापासून तुकाराम महाराज पालखीच्या माध्यमातून येणाऱ्या वारकऱ्यांना मिठाई व फराळचे वाटप करत आहे.या उपक्रमास सणसर ग्रामपंचायतचे माजी सरपंच रणजीत निंबाळकर सणसर सोसायटीचे माजी चेअरमन विक्रम निंबाळकर तसेच इंदापूर मार्केट कमिटीचे संचालक अमोल भोईटे उपस्थित होते.या उपक्रमाचे आयोजन सणसर सोसायटीचे माजी चेअरमन शब्बीर काझी इंदापूर तालुका अल्पसंख्याक विभागचे अध्यक्ष इकबाल शेख हमीद तांबोळी,राजूभाई पठाण,हबीब शेख जावीदभाई मुल्ला,अन्सार मनेरी,अशफाक काझी,इकबाल काझी,मुबारक शेख,इनुस काझी यांच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी दीड हजार वारकऱ्यांना मिठाई फराळाचे वाटप केले जाते.




# विद्यार्थी गुणगौरव सोहळा:उद्याचा दिवस सोन्याचा हवा असेल तर कष्ट करा

### वैनतेय विद्यालयात 10 वी व 12 वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासाठी प्रोत्साहन वाढवणे, चांगले काम करणाऱ्या विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवणे, समाजासमोर एक आदर्श निर्माण करणे, विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकी देऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देणे दि. २७ रोजी निफाड येथील न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संचलित वैनतेय विद्यालयातील 10 वी आणि 12 वीतील तसेच दावचवाडी येथील योगेश्वर विद्यालयातील 10 वी परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा




सन्मान सोहळा निफाड येथील वैनतेय विद्यालयात आयोजित करण्यात आला होता निफाड सध्याच्या नवीन युगाला तंत्रज्ञानाला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी आपलं ज्ञान अपडेट केलं पाहिजे परीक्षांमध्ये येणाऱ्या अपयशाने खचू नका अपयश ही यशाची पुढची मोठी पायरी असते शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि मनोबल वाढवल पाहिजे त्याच्या प्रगतीला बळ देण्याचे काम शिक्षकांनी केलं पाहिजे असे प्रतिपादन कवी व ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मण महाडिक यांनी केले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि.दा.व्यवहारे होते तर प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त रतन पाटील वडघुले, अँड दिलीप वाघवकर, विश्वास कराड ,वैनतेय विद्यालयाचे प्राचार्य बी. आर.सोनवणे, उपप्राचार्या मनीषा गुजराथी ,पर्यवेक्षक गुलाब टकले ,पर्यवेक्षक बी. बी .गुंजाळ , वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्य पल्लवी सानप, प्रभारी मुख्याध्यापक सुनील मोगल, मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे ,मुख्याध्यापिका प्रसन्ना कुलकर्णी,आदी मान्यवर उपस्थित होते प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य बी आर सोनवणे यांनी केले प्रमुख अतिथींचा परिचय रशीद पठाण यांनी करून दिला याप्रसंगी लक्ष्मण महाडिक ,वि. दा.व्यवहारे यांची भाषणे झाले , लक्ष्मण महाडिक यांनी भाषण करताना काही कविता उपस्थित विद्यार्थ्यांना ऐकवल्या याप्रसंगी सुधाकर कापसे ,गोरख सानप ,मकरंद मोगल यांच्यासह पालक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कांचन सानप यांनी तर आभार प्रदर्शन उपप्राचार्या मनीषा गुजराथी यांनी केले .

## पुणे-हावडा दुरंतो एक्सप्रेसला गोंदिया व भंडारा रोड स्थानकांवर थांबा देण्याची मागणी — खासदार डॉ. प्रशांत पडोळे यांचे रेल्वे मंत्रालयाला पत्र

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड**
**प्रतिनिधी गोंदिया**



**गोंदिया-** भंडारा लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी खासदार डॉ. प्रशांत यादवरावजी पडोळे यांनी प्रवाशांच्या सोयीसाठी ट्रेन क्रमांक 12221/12222 पुणे–हावडा एसी दुरंतो एक्सप्रेस या गाडीचा गोंदिया व भंडारा रोड रेल्वे स्थानकांवर थांबा द्यावा, यासाठी रेल्वे मंत्रालयाला अधिकृत पत्र पाठवले आहे. सध्या ही गाडी नागपूर स्थानकावर थांबल्यानंतर थेट रायपूर येथे थांबते. मार्गामध्ये असूनही गोंदिया आणि भंडारा रोड यांसारख्या महत्त्वाच्या स्थानकांवर या गाडीला थांबा नाही. त्यामुळे या परिसरातील नागरिक, विद्यार्थी व व्यवसायिकांना नागपूर किंवा रायपूर येथे जाऊन गाडी पकडावी लागते, ज्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम यांचा अपव्यय होतो. खासदार डॉ. पडोळे यांनी पत्रात नमूद केले आहे की, या गाडीला गोंदिया व भंडारा रोड स्थानकांवर थांबा दिल्यास विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी आणि ज्येष्ठ नागरिक यांना मोठा फायदा होईल. तसेच रेल्वेच्या उत्पन्नातही वाढ होईल. रेल्वे मंत्रालयाने जनहिताचा विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा खासदार महोदयांनी व्यक्त केली आहे.



पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांचे वाढदिवसानिमित्त भाजपा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितिन पाटील यांनी अभिष्टचिंतन केले. या वेळी त्यांच्या सोबत भाजपा पनवेल शहर पदाधिकारी रुपेश नागवेकर, प्रितम म्हात्रे, केदार भगत, उमेश इनामदार, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.

( छाया -दैनिक युवक आधार)



भाजपा उत्तर रायगड जिल्हा ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजेशजी गायकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना सोशल मीडिया सेल संयोजक तथा ओबीसी मोर्चा जिल्हा संयोजक प्रसाद हनुमंते, ओबीसी मोर्चा जिल्हा चिटणीस प्रसाद म्हात्रे, सद्दाम बागबान, सुरज पावणेकर, गजानन जोशी आणि निवृत्त BSNL अधिकारी बिरजा पाधी उपस्थित होते

( दैनिक युवक आधार )

## गडकिल्ल्यांची माहिती व्हावी या उद्देशाने प्रमोद कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून पहिल्याटप्प्यातील दोनशे विद्यार्थ्यांना वह्याचे वाटप

### मान्यवरांच्या उपस्थितीत स्वा.सावरकर युवा मंचचा उपक्रम

दैनिक युवक आधार
संतोष पुदाले
तुळजापूर

नळदुर्ग-हिंदवी स्वराज्याचे संस्थापक,अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत,छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांची माहिती विद्यार्थीना व्हावी,या प्रामाणिक उद्देशाने शहरातील पाचशे विद्यार्थ्यांना,गडकिल्ल्यांचे कव्हर व माहिती असलेल्या वह्याचे मोफत वाटप स्वा.सावरकर युवा मंचचे अध्यक्ष मा.प्रमोद कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून आयोजित केला होता त्याच अनुषंगाने आज दि- 27 जून रोजी जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा,माऊली नगर,नळदुर्ग येथील पहिल्या टप्पातील 200 विद्यार्थ्यांना वह्याचे वाटप करण्यात आले,यामध्ये छत्रपती शिवरायांच्या रायगड,प्रतापगड,शिवनेरी,तोरणा,राजगड आदीसह अनेक किल्यांची थोडक्यात माहिती,चित्रदर्शन व प्रश्नमंजुषा नमूद केल्या आहेत,कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी वैद्यकीय अधिकारी डॉ.मडके,तलाठी कुलकर्णी मॅडम,मनसेचे शहराध्यक्ष अलिम शेख,शिवसेना(ठाकरे)शहर प्रमुख संतोष पुदाले,भाजपा शहराध्यक्ष तथा माजी नगरसेवक बसवराज धरणे,जेष्ठ पत्रकार विलास येडगे,दिपक सर जगदाळे,उत्तम बनजगोळे,प्रसन्न कुलकर्णी,शाळेचे मुख्याध्यापक मस्के सर यांच्या शुभहस्ते वह्याचे वाटप करण्यात आले,परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष(राज्यमंत्री दर्जा)या संकल्पनेचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या,याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक भास्कर मस्के सर



सुंदर भालकाटे,वंदना चौधरी,सुरेखा मोरे,बिलाल सौदागर,जयश्री धुमाळ,राहुल खोडके,प्रीती भंडारे यांच्यासह विद्यार्थी,पालक व नागरिक मोठया उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बिलाल सर यांनी केले तर प्रास्ताविक प्रमोद कुलकर्णी,संतोष पुदाले यांनी केले व आभार खोडके सरांनी मानले,या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## भूमिपुत्र कडून पूरग्रस्त भागाची पाहणी

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**



दिनांक 25 व 26 जून 2025 ला रिसोड तालुक्यातील पिंपरी, कुकसा, जोगेश्वरी आंचळ नेतन्सा, जाखेडा, तपोवन तथा बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव परिसरात अतिवृष्टी आणि ढगफुटी सदृश्य पाऊस झाला होता. अचानक आलेल्या पावसाने परिसर पूर्णपणे जलमय झाला होता. पावसानं झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी भूमिपुत्र चे संस्थापक अध्यक्ष तथा रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विष्णुपंत भुतेकर भूमिपुत्र च्या पदाधिकाऱ्यांसह आज शेतकऱ्यांच्या शेतात प्रत्यक्ष नुकसानीची पाहणी करण्यासाठी गेले होते. अचानक आलेल्या पावसानं शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी घुसले. पेरणी झालेल्या शेतातील पिके वाहून गेली, हळद लावलेल्या शेकडो एकरातील पिके आणि शेती पूर्णपणे वाहून गेली. शेतातील सिंचन साहित्य, ड्रीप, तुषार संच पूर्णपणे वाहून गेले. सिंचनासाठी उभ्या करण्यात आलेले सोलार, विजेचे खांब वाहून गेले. सर्व परिसरातील रस्ते उखडून गेले आहेत. खरडून गेलेल्या शेत्या पेरणी योग्य होण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांना जमीन दुरुस्तीसाठी वेगळी मदत करणे आवश्यक आहे. पिक नुसकानी बरोबरच जमीन दुरुस्ती साठी आणि बांधबंधिस्ती, परिसरातील नाला खोली करनासाठी कृषी विभाग व महसूल विभागाने स्वतंत्रपणे पाहणी करून पुर ग्रस्त भागातील शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. अशा प्रकारची मागणी विष्णुपंत भुतेकर यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री महसूल मंत्री मा. देवेंद्र फडणवीस, जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. दत्तामामा भरणे, जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केलेली आहे. सरकारनं मदत न केल्यास भूमिपुत्र शेतकरी संघटना शेतकऱ्यांना घेऊन रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नसल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. पाहणी करिता भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे ज्ञानबा माऊली बाजड, गजाननराव जाधव, युवक अध्यक्ष अमोल बाजड, मुरलीधर जुनघरे, जीवन पाटील, प्रकाश पाटील वाळूकर, नारायण खराटे, पिंटू वाळूकर, दीपक पाटील, मुरली पाटील आरू शंकर हजारे, विजिनाथ वानखेडे, रवि वानखेडे तथा मोठ्या प्रमाणावर शेतकरी व भूमिपुत्रचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुरुड येथे नवीन बस डेपो मंजूर करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) यांच्या तर्फे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,लातूर यांना निवेदन.

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी**
**:- मोहम्मद पिंजारी**

मुरुड ता. जि. लातूर हे नांदेड- लातूर- बार्शी- पुणे- मुंबई या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 63 वर वसलेले शहर असून मुरुड शहराची लोकसंख्या 50000 आहे. सदरील शहर लातूर धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवर असून मुरुड शहरात मोठी व्यापार पेठ ,शैक्षणिक संकुल, आरोग्य सेवा उपलब्ध असल्यामुळे आजूबाजूच्या 40 ते 50 गावचा मूलभूत गरजांसाठी दररोजचा संपर्क आहे

मुरुड शहरातून राष्ट्रीय महामार्ग जात असल्यामुळे दररोज 170 जाणाऱ्या170 येणाऱ्या अशा एकूण 340



बसच्या फेऱ्या होतात. त्या माध्यमातून दररोज 10 हजार नागरिक बसने प्रवास करतात. राष्ट्रीय महामार्गावर असल्यामुळे सकाळी 6 ते रात्री 12 ते1 वाजेपर्यंत बस फेऱ्या सुरू असतात. 40 ते 50 गावांचा बस प्रवाशांचा दररोजचा संपर्क मुरुड शहराशी येतो तसेच मुरुड बस स्थानकात दररोज 10 बस मुक्कामी असतात.

नवीन बस डेपो साठी मुरुड बस स्थानकाच्या पाठीमागे जागा उपलब्ध ( तलाव ) आहे. रेल्वे स्टेशन रोडला महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ (पोल फॅक्टरी) व लातूर मुरुड मार्गावर रायगव्हाण प्रकल्प (इरिगेशन कॉलनी) सुद्धा जागा उपलब्ध आहे. मुरुड शहरापासून खालील शहरातील बस डेपो अंतर

१) लातूर- 36 कि.मी
२) औसा - 35 कि.मी
३) धाराशिव 40 कि.मी ४)कळंब 40 कि.मी ५)आंबेजोगाई 45 कि.मी

नियमाप्रमाणे 30 किलोमीटर अंतरावर बस डेपो पाहिजे तरी वरील सर्व डेपो असलेल्या शहरापासून मुरुड शहराचे अंतर हे 30 किलोमीटर पेक्षा जास्त असल्यामुळे मुरुड येथे नवीन बस डेपोची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे नवीन बस डेपो मंजूर करावा. ही नम्र विनंती दिनांक 28 जून 2025 वार शनिवार रोजी विभाग नियंत्रक कार्यालय, लातूर या ठिकाणी जाऊन सदरील निवेदन श्री अश्वजीत जानराव साहेब विभाग नियंत्रक लातूर यांना देण्यात आले तसेच बस स्थानक क्रमांक दोन वरून सुटणाऱ्या बस लवकरात लवकर मुख्य बसताना कोणी सोडाव्यात अशी विनंती करण्यात आली. यावेळी महामंडळाचे अधिकारी श्री वेंकट बिराजदार साहेब श्री सतीश मिसाळ श्री प्रमोद गाडे श्री मोहित डोळसे उपस्थित होते.

## मालमत्ता कर विषयी संभ्रमित करणाऱ्या अधिकाऱ्यानवर कारवाई करावी कॉलनी फोरम अध्यक्ष लिना गरड यांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कराचा वाद सुप्रीम कोर्ट तसेच मुंबई हायकोर्ट येथे चालू आहे. याशिवाय राज्य शासनाच्या पातळीवर काही दिवसापूर्वीच 19 जूनला मीटिंग झाली असून, त्यामध्ये नगर विकास विभागाचे प्रधान सचिव श्री गोविंद राज साहेब यांनी बैठकीमध्येच आयुक्त महोदयांना शास्ती माफीचा निर्णय घेण्याबाबत स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. तसेच इतर विषयासाठी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मंत्रालय मध्ये पुन्हा बैठक होणार आहे. असे असतानाही पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभाग पथकातील अधिकारी महानगरपालिकेची गाडी घेऊन, महानगरपालिकेचे



आयडी कार्ड गळ्यामध्ये घालून, सोसायटीमध्ये जातात आणि फक्त शास्ती माफीची विनंती करण्याबाबत, सोसायटीकडून महानगरपालिकेला पत्र देण्याची सूचना करतात. एवढेच नाही तर, इतर सोसायटी यांनी दिलेल्या पत्राचे नमुने सुद्धा सोसायटी पदाधिकारी यांना देतात. एकंदरीतच महापालिकेचे अधिकारी स्वतःच्या कामाचा भाग नसतानाही, सोसायटी पदाधिकारी यांना संभ्रमित करून, तसेच भीती घालून किंवा लालच देऊन शास्ती माफी करण्याचे पत्र घेत आहेत. ही बाब अत्यंत गंभीर असून चुकीची आहे. आमच्याकडे सोसायटी पदाधिकाऱ्यांनी याबाबत तक्रारी केलेल्या आहेत. खरंतर मालमत्ता करा बाबत आम्ही गेल्या चार-पाच वर्षांपासून खालील प्रमुख मागण्यावर लढा देत आहोत. 1. सिडको महामंडळाकडून सेवा दिल्यानंतर महापालिका स्थापनेच्या ऑक्टोबर 2016 ते ऑक्टोबर 2022 पर्यंत सेवाशुल्क वसूल केलेले आहे. याच काळात महानगरपालिकेने एक रुपयाचा खर्च न करता, एक रुपयाची सेवा न देता डबल टॅक्स लावलेला आहे. तो वगळण्याचा विषय उच्च न्यायालयात तसेच राज्य स्तरावर प्रलंबित आहे. 2. गावठाण हद्दीमधील 31 हजार मालमत्तांना कलम 129A अन्वये दिलेली सुमारे 65 टक्के ची कर सवलत, सिडको वसाहती मधील सुमारे अडीच लाख मालमत्ताधारकांना देण्याचा विषय ही माननीय न्यायालय तसेच राज्य स्तरावर प्रलंबित आहे. 3. पूर्वलक्षी प्रभावाने लावण्यात आलेल्या बेकायदेशीर मालमत्ता कराचा विषय न्यायालयात प्रलंबित आहे. 4. तसेच 500 चौरस फुटापेक्षा लहान घरांना मालमत्ता कर माफीचा विषय राज्य स्तरावर चालू आहे. इतरही अशाच तांत्रिक बाबींवर निर्णय झालेला नसताना, महानगरपालिकेचे अधिकारी सोसायटी पदाधिकाऱ्यांना संभ्रमित करून, जबरदस्तीने महानगरपालिकेच्या नावाने पत्र घेण्याची महापालिका अधिकाऱ्यांची कृती बेकायदेशीर आहे. खारघर आणि कामोठा शहरात ज्या ज्या अधिकाऱ्यांनी अशी कृती केलेली आहे, त्यांना समक्ष बोलावून जाब विचारून, त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी, तसेच असा प्रकार पुन्हा होणार नाही याची महानगरपालिका स्तरावर काळजी घ्यावी ही विनंती कॉलनी फोरमच्या अध्यक्षा लिना गरड यांनी पनवेल महापालिकेला केली आहे

## उसर गेल इंडिया कंपनीत प्रकल्पग्रस्तांचा बेमुदत कामबंद आंदोलन सुरू; लेखी कराराशिवाय मागे हटणार नाही – निलेश गायकर यांचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

प्रकल्पग्रस्तांची थेट हाकः "आश्वासनं फसवी, आता कंपनी ठप्प!"अलिबाग तालुक्यातील उसर येथील गेल इंडिया लिमिटेड कंपनीविरोधात प्रकल्पग्रस्त कामगारांनी बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले असून, मागील आंदोलनात दिलेली आश्वासने अद्याप अपूर्ण असल्याने ही निर्णायक पावले उचलण्यात आली आहेत. सयुक्त प्रकल्पग्रस्त कामगार आंदोलन समितीचे अध्यक्ष निलेश गायकर यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जोपर्यंत कंपनी व्यवस्थापन व जिल्हा प्रशासन लेखी स्वरूपात नोकरी संदर्भातील आश्वासन देत नाहीत, तोपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नाही.यापूर्वी २३ एप्रिल रोजी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांसाठी साखळी उपोषण व कामबंद आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर २८ एप्रिल रोजी खासदार सुनील तटकरे, जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी आणि कंपनी प्रशासन यांच्या उपस्थितीत बैठक झाली होती. या बैठकीत प्रकल्पग्रस्तांना नोकरीत प्राधान्य, स्थानिकांना सेवा संधी आणि एम.06 वाहनधारकांना संधी देण्याचे ठरले होते. मात्र, महिन्यांनंतरही कंपनीकडून कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत. या निष्क्रियतेच्या विरोधात २५ जून रोजी "भिक मागो आंदोलन" छेडण्यात आले आणि त्यानंतर २६ जूनपासून बेमुदत कामबंद आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा २६ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात खासदार तटकरे यांच्या समवेत कंपनी अधिकाऱ्यांशी चर्चा झाली. यामध्ये दिल्ली पातळीवर नोकर भरती संदर्भात आणि CSR निधीबाबत प्रयत्न करण्याचे तटकरे यांनी आश्वासन दिले.तथापि, लेखी कराराशिवाय कोणतेही तोंडी आश्वासन मान्य नसल्याचे आंदोलन समितीने स्पष्ट केले आहे. "आमच्या जमिनी घेतल्या, रोजगार दिला नाही आता आम्ही मागे हटणार नाही," असा ठाम निर्धार प्रकल्पग्रस्तांनी व्यक्त केला आहे.



# विध्यार्थी - पालक मेळाव्याच्या निमित्ताने दहावी बारावीच्या गुणवत्त विद्यार्थ्यांचा दैनिक युवक आधार च्यावतीने सन्मान.








**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :**
**- मारुती सत्रे**

महेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रुई नालकोल या शाळेमध्ये विध्यार्थी - पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते त्याचे औचित्य साधून दैनिक युवक आधारच्या वतीने दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून कडा उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्री नामदेव धोंडे ,कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री उत्तम भुकन सर ,सरपंच तात्यासाहेब नालकोल,उपसरपंच विष्णू मांढरे,सोसायटी चेअरमन मारुती शिवरकर,या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम घेण्यात आला.व प्रमुख पाहुण्यांनी शिक्षकांना व पालकांना आणि विद्यार्थ्यांना मोबाईलचे फायदे आणि दुष्परिणाम याबाबत माहिती दिली मोबाईल पासून कशाप्रकारे अभ्यास करू शकतो या गोष्टीचे प्रामुख्याने माहिती देण्यात आली. मोबाईल पासून आपणास वाईट गोष्टीचे परिणाम काय होऊ शकतात, तसेच एम पी एसी व यू पी एस सी तसेच एम बी बी एस, नेट परीक्षा इंजीनियरिंग,अशा अनेक स्पर्धा परीक्षा विषयी कशाप्रकारे अभ्यास केला पाहिजे या सखोल विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. दहावी बारावी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा दैनिक युवक आधार च्या वतीने बीड जिल्हा प्रतिनिधी मारुती सत्रे व उपस्थित मान्यवराच्या हस्ते सन्मान पत्र देऊन सन्मानित करण्यात आले,तसेच गुणवत्ता गौरव पुरस्कार पत्र देऊन महेश विद्यालय रुई नालकोल शाळेला सन्मानित करण्यात आले. उपस्थित पालक श्री भरत काळे,श्री शंकर औटे,श्री केशव भिसे,श्री अशोक कापरे,श्री अशोक बन्सोडे,श्री आजिनाथ कन्हेकर,श्री अण्णा शेळके,श्री दादा बंडाले,श्री बाळू खांडेकर,श्री समीर सय्यद,श्री अजिनाथ हिंगणे,श्री समीर शेख,उपस्थित होते. शिक्षक श्री शिंदे एन के सर,प्रा.तोडकर सर श्री हजारे सर,प्रा परदेशी सर,श्री नालकोल सर,श्री परमेश्वर गांजुरे सर, प्रा शेलार सर,श्री बोडके एस एस सर,प्रा एकशिंगे सर,श्री बोडखे एम व्ही सर,श्री वाघूली सर,श्री खिल्लारे सर,श्री तुळशीराम मासाळकर,श्री अशोक गांजुरे,श्री अमोल धोंडे,श्रीमती गिलचे मॅडम,श्री महेश गायकवाड,या सर्व मुख्याध्यापक शिक्षकांकडून येणाऱ्या पाहुण्यांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली तसेच दैनिक युवक आधारच्या वतीने सन्मानपत्र देऊन विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आल्याबद्दल शाळेच्या वतीने अभिनंदन केले.

## सालेवडगांवपासून गणेशवाडी कडे जाणाऱ्या रस्त्यावरील नदीवर नळकांडी पूल करा-ॲड. संभाजी दहातोंडे

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**



**बाळासाहेब रकटाटे** - तालुक्यातील सालेवडगांव पासून गणेशवाडी कडे जाणाऱ्या रस्त्यावरील नदीवर नळकांडी पूल नसल्याने पावसाळ्यामध्ये नदीला पूर येतो मुलांना शाळेत जाण्यासाठी अडचण निर्माण होते नागरिकांनाही याचा खूप मोठ त्रास सहन करावा लागत आहे रात्री अपरात्री आजारी पेशंट असतील त्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असून २५ ते ३० घरांची वस्ती येथे असल्याने तात्काळ या नदीवरील नळकांडी पूल अत्यंत करणे गरजेचे आहे. तरी सदरील नदीवरचापूल करा-अड. संभाजी पूल मंजूर करावा अशी विनंती ॲड. संभाजी दहातोंडे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्याकडे ६ फेब्रुवारी रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद आहे की सालेवडगांव पासून ते गणेशवाडी गावापासून अनेक लहान छोटी मोठी मुले विद्यार्थी आहेत. कोणी पहिली कक्षात आहे. तर कोणी दुसरी कक्षात आहे तर कोणी 'अंगणवाडीमध्ये शिक्षण घेत आहे. सालवडगांव ते गणेशवाडी अंतर २ किलोमीटरचे आहे. वाटेत मोठी नदी अँड .संभाजी दहातोंडे यांनी सांगितले की पावसाळ्यात नदीला पाणी राहते त्यामुळे मुलांना शाळेत येण्या जाण्यासाठी पाण्यातून प्रवास करावा लागत आहे. काही वेळेस नदीला जास्त पाणी येते अशा वेळेस मुलांना येता जाता येत नाही आणि नदी पार करण्यासाठी मोठी अडचण निर्माण होते. गणेश वाडीवर राहणाऱ्या लोकांनाही रात्री असुविधा होत आहे. त्यामुळे सालेवडगांव ते गणेशवाडी जाणाऱ्या रस्त्यावरील नदीवरील नळकांडी फुल होणे अत्यंत गरजेचे असून आपण विशेष अधिकार वापरून सदरील नदीवरचा पुल मंजूर करावा अशी मागणी केली आहे.

## नागपूर येथे जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**नागपूर** - अर्पण बहुउद्देशीय संस्था नागपूर द्वारा संचलित रिलिप व्यसनमुक्ती उपचार व पुनर्वसन केंद्र नवीन गाडगे बाबा नगर नागपूर केंद्रा तर्फे दि. 26 जून जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले नंदनवन पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक आकाश भैराट यांनी व्यसन व व्यसनातून होणारे गुन्हे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच भगवती महाविद्यालय येथील प्राचार्य सौ.दीपा हटवार यांनी व्यसनातून परिवार नाते संबंध समाज यातून व्यसनी कसा दूर होऊन दुभागला जातो यावर मार्गदर्शन केले. त्याच प्रमाणे बार्टी समतादूत, प्रबोधनकार सतीश सोमकुवर यांनी व्यसनामुळे व्यक्तीच्या मानसिक, शारीरिक, सामाजिक व आर्थिकतेवर होणारे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन केले. या प्रसंगी अर्पण बहुउद्देशीय संस्थेच्या सचिव सौ. नंदा आदमने यांनी सुद्धा व्यसनावर मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे ए. ए. सदस्य रवींद्र निमकर व नंदनवन पोलिस स्टेशन येथील अनिकेत वैध, धीरज थोटे , लंकेश उपस्थित होते . कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन समुपदेशक महेंद्र वैरागडे यांनी मानले. व कार्यक्रम यशस्वी करण्याकरता धीरज , आशिष , निलेश, निखिल या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.




## युवा ग्रामीण पत्रकार संघटना मावळ तालुका अध्यक्ष पदी श्री. दिपक चव्हाण यांची नियुक्ती.

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**



देहूगाव :ग्रामीण पत्रकारितेत आणि सामाजिक कार्यात सक्रीय भूमिका बजावणारे आणि सातत्याने सामाजिक प्रश्नांना वाचा फोडणारे श्री. दिपक चव्हाण यांची "राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघ" मावळ तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.ही निवड संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. गणेश कचकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मा. गणेश महाडिक यांच्या उपस्थितीत आणि मा. कांताभाऊ राठोड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी संतोष लांडे (विभागीय अध्यक्ष),श्री.गोपाळ भालेराव पुणे जिल्हा उपाध्यक्ष ग्रामीण सतीश कुमार कोकरे (हवेली तालुका अध्यक्ष), अमित मोरे (हवेली तालुका उपाध्यक्ष), संतोष सातकर, पुणे जिल्हा उपाध्यक्ष आदी मान्यवर उपस्थित होते. नवीन नियुक्तीच्या निमित्ताने श्री. दिपक चव्हाण यांना परिसरातील पत्रकार तसेच सामाजिक कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुढील काळात ग्रामीण भागातील पत्रकार बांधवांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि त्यांच्या हितासाठी सक्रीय काम करण्याचा निर्धार श्री. दिपक चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केला.आणि वरील सर्व पदाधिकारी यांचे आभार मानले.

## तेजल पाटील यांची मुंबई महापालिकेच्या निरीक्षक पदावर नेमणूक – पालघर तालुक्याचा अभिमान!

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**



चंडीगाव (पालघर), दि. २८ जून (प्रतिनिधी): स्व. श्री. मनोहर हरिश्चंद्र पाटील यांची कन्या तेजल मनोहर पाटील यांनी MPSC परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण करून मुंबई महानगरपालिकेत निरीक्षक (INSPECTOR) पदासाठी निवड होण्याचा मान मिळवला आहे. त्यांचे मूळ गाव पालघर तालुक्यातील चंडीगाव असून, त्या सध्या मुंबई येथे वास्तव्यास आहेत.

या यशामागे त्यांची चिकाटी, अभ्यासू वृत्ती आणि सातत्य यांच्यासोबतच त्यांचे पती श्री. प्रज्ञेश रमाकांत कोरे (मुंबई) यांचाही मोलाचा पाठिंबा लाभला आहे. त्यांच्या प्रोत्साहनामुळे आणि सातत्यपूर्ण साथीनं तेजल पाटील यांनी हे स्वप्न साकार केलं. त्यांच्या या घवघवीत यशामुळे चंडीगावसह संपूर्ण पालघर तालुक्याला अभिमान वाटतो आहे. सूर्ववंशी क्षत्रिय युवक मंडळ, पालघर तालुका पूर्व विभाग यांच्यावतीने तेजल पाटील यांना हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टीची पीएम श्री शाळेसाठी निवड

### " गुणवत्तेचं खणखणीत नाणं, जिल्हा परिषद शाळा हेच अस्सल सोनं "

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी**
**बाळासाहेब रकटाटे**

आष्टी तालुक्यातीलच नव्हे तर बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद बीड ची सर्वात जास्त मुलींची पटसंख्या असलेली व मुलींना स्वरक्षणाची हमी देणारी तसेच १०० % निकालाची उज्जल परंपरा असलेली जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी, ता. आष्टी, जि. बीड असून आजच्या धावपळीच्या युगात गुणवत्तेचं शिक्षण मिळणं म्हणजेच समाजाच्या भविष्याची ग्वाही, हेच वास्तव आष्टी येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेने आपल्या कार्यातून सिद्ध केलं आहे. आधुनिक शाळांच्या झगमगाटात ही शाळा गुणवतेचे ठिकाण आहे. शहर बदलतील, देश बदलेल हे स्वप्न साकार करण्याची खरी सुरुवात होते ती प्राथमिक शिक्षणातून आणि हेच स्वप्न साकार करण्याचे कार्य आष्टी येथील जिल्हा परिषद कन्या प्रशाला



सातत्याने करत आहे. गुणवत्ता, उपक्रमशीलता, स्वच्छता, पर्यावरण सजगता आणि सर्वांगीण विकास यामुळे ही शाळा खऱ्याअर्थाने शिक्षण व्यवस्थेचा मानबिंदू ठरली आहे. सुसज्ज दोन मजली इमारत, २४ वर्गखोल्या, सी. सी. टिव्ही कॅमेरे, शिक्षकांसाठी डिजीटल उपस्थिती, शुद्ध पाणी पिण्याची खास व्यवस्था, स्वतंत्र बोरवेल, मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, स्वयंपाकासाठी अद्ययावत किचन शेड, बाग फुलवणारा हिरवागार परिसर हे शाळेचे जणू प्रतीकल बनले आहे. परिसर अनेक प्रकारांच्या झाडांनी नटलेला असून, पर्यावरणस्नेही शाळा म्हणून तिची वेगळी ओळख आहे. शाळेत इ. १ ली ते इ. १० वी सर्व वर्ग सेमी इंग्रजीत असून प्रशिक्षित व पुरस्कारप्राप्त शिक्षक मार्गदर्शन करतात. स्पर्धा परीक्षा, सामान्यज्ञान, नवोदय, मंथन, शिष्यवृत्ती परिक्षा, एनएमएनएस परिक्षा, विज्ञान प्रदर्शन, कला क्रीडा स्पर्धा, आनंद मेळावा, शैक्षणिक सहली, महिला पालक मेळावे, बालवृक्ष दिंडी, शालेय व वर्ग मंत्रिमंडळ निवडणूक यांसारखे उपक्रम नियमित राबवले जातात, या शाळेची सुंदर रचना, उत्कृष्ट शिकवण आणि सर्वांगीण विकास याचा परिपाठ राबवते आहे. आज वेगवेगळ्या भागात अनेक प्राथमिक शाळांची अवस्था दयनीय आहे, मात्र जिल्हा परिषद कन्या प्रशाला याला अपवाद ठरते. शिक्षण हीच खरी शक्ती आहे हे पुन्हा सिद्ध करणारी ही शाळा खऱ्याअर्थाने " गुणवत्तेचं खणखणीत नाणं " आहे आणि जिल्हा परिषद शाळा हेच अस्सल सोनं हे सत्य अधोरेखित करते. अशा या सर्वगुणसंपन्न व आदर्श शाळेची पीएम श्री शाळेसाठी निवड झाली आहे.

जिल्हा परिषद कन्या प्रशाला आष्टी, ता. आष्टी, जि. बीड ची पीएम श्री शाळेसाठी निवड झाल्याबद्दल शाळेतील आदर्श शिक्षक - शिक्षिका आबासाहेब खताळ (मुख्याध्यापक), सतिश दळवी, श्रीम. सुरेखा कुटे, श्रीम. संगिता दहिफळे, सुरेश नरोड, श्रीम. स्वाती टेकाडे, श्रीम. नाजिया बागवान, भोकरे संजय, विठ्ठल जगताप, श्रीम. लतिका तरटे, राजेंद्र लाड, दत्तात्रय गाडेकर, देविदास शिंदे, आप्पासाहेब काळे, श्रीम. आशा शिंदे, श्रीम. रुक्मिण करपे, शिवाजी आव्हाड, श्रीम. अश्विनी धस, श्रीम. रोहिणी कार्ले, संतोष खंडागळे, राजेंद्र शेळके, शरद राऊत, श्रीम. धोंडे मनिषा, श्रीम. धोंडे अर्चना चित्रकला शिक्षिका श्रीमती कोमल थैटे मॅडम व श्रीम. सुनिता पोकळे मॅडम तसेच आदर्श सेवक संतोष धोंडे, श्रीम. सावित्रा जाधव यांचे शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा श्रीम. सुजाता झगडे व सदस्य श्रीम. प्रभा वायकर, श्रीम. समरीन काझी, श्रीम. जयश्री धोंडे, श्रीम. अश्विनी घालमे, श्रीम. विद्या डोंगरदिवे, श्रीम. अनिता लांबडे, श्री. लक्ष्मण रेडेकर सर, श्री. डॉ. नदीम शेख साहेब आदींनी अभिनंदन करुन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# दलालांचे धाबे दणाणले !

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय**
**प्रतिनिधी:-राजू शिंदे.**

राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी कामगार कल्याण मंडळाच्या योजनांमध्ये बोगस कागपत्रांच्या आधारे शासनाची आर्थिक फसवणूक करणाऱ्या दलालांच्या विरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. यामुळे दलाल, एजंटांचे आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या कामगार अधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या योजनांमध्ये बोगस काग दपत्रांच्या आधारे बोगस कामगारांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी दलाल, एजंटांचे मोठे रॅकेट कार्यरत आहे. काही ठिकाणी या दलालांनी कामगारांच्या नावाने संघटना सुरू केल्याचे भासविले जात आहे. यातून बनावट कामगारांना मंडळाच्या योजनांचा लाभ मिळवून देत त्यांच्याकडून मोठया प्रमाणात पैसे उकळले जातात. जालना जिल्ह्यात अशा पद्धतीने दलालांचे मोठे रॅकेट सक्रिय झालेले आहेत. याकडे कामगार अधिकारी यांच्याकडून दुर्लक्ष केले जाते. दरम्यान, कामगार कल्याण मंडळाच्या योजनांवर दलालांकडून डल्ला मारला जात असल्याने कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी या अनागोंदीला चाप लावण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत त्यांच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. नोंदणी, कीट वाटप व अन्य बाबतीत गैरप्रकार होत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून आता राज्यभरात जिल्हास्तरावर दक्षता पथके स्थापन करून प्रभावी तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे. प्रत्येक विभागात, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा कार्यालय प्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक स्वतंत्र जिल्हास्तरीय दक्षता पथक जाईल.

**फौजदारी गुन्हे दाखल होणार**

दक्षता पथकांना नेमून दिलेल्या जिल्ह्यांमध्ये बनावट कागदपत्रांद्वारे होणारी नोंदणी, नोंदणीसाठी पैसे मागण्याचे प्रकार तसेच खोटे दाखले सादर करून मिळविले जाणारे लाभ या बाबींवर लक्ष केंद्रित करून तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे. संबंधित दलालांविरोधात फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात येणार आहे. यामुळे जालना जिल्ह्यातील दलालांचे धाबे दणाणले आहे.

नेमण्यात येणार आहे. या पथकांचे कार्यक्षेत्र मात्र त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्याऐवजी दुसऱ्या जिल्ह्यावर असेल, जेणेकरून कारवाई अधिक निष्पक्ष आणि प्रभावीपणे केली



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे सुरळीत आयोजन वालचंदनगर पोलिसांचे प्रशंसनीय योगदान

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

दि.27 जून रोजी जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांची पालखी इंदापूर तालुक्यातील सणसर या गावात मुक्कामी होती.पालखीच्या आगमना निमित्त सणसर आणि परिसरातील लाखो वारकरी, भाविक,नागरिक यांनी मोठ्या श्रद्धेने आणि भक्तिभावाने दर्शन घेतले. या भव्य सोहळ्याचे योग्य नियोजन,शिस्तबद्ध सुरक्षा व्यवस्था आणि भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी वालचंदनगर पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक राजकुमार डूणगे व त्यांच्या सहकारी टीमने अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने नियोजन आणि कार्यक्षमता दाखवली. महिलांसाठी स्वतंत्र रांग, वाहतूक नियंत्रण, आपत्कालीन उपाययोजना आणि गर्दीच्या नियमनासाठी अधिकारी आणि कर्मचारी दिवसभर सज्ज होते.पोलीस खात्यातील महिला अधिकारी ही सुरक्षेच्या आघाडीवर कार्यरत होत्या.संत तुकाराम महाराज व वारकरी संप्रदाया विषयी आपली निष्ठा आणि सामाजिक कर्तव्य यांची उत्तम सांगड घालणारे हे पोलिसांचे कार्य सर्व स्तरातून कौतुकास्पद ठरले आहे. यावेळी उपस्थित असलेल्या अनेक वरिष्ठ अधिकारी व नागरिकांनी,वारकऱ्यांनी पोलीस दलाचे आभार मानले व त्यांच्या सेवाभावी वृत्तीचे मनःपूर्वक कौतुक देखील केले आहे.



## उदगीर तालुक्यात नालासरळीकरण व बंधारे दुरुस्ती कामाच्या चौकशीसाठी मंगेश सुर्यवंशी यांचे आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**बालाजी तेलंगे**
**उदगीर/ प्रतिनिधी**

उदगीर तालुक्यात नालासरळीकरण व बंदारे दुरुस्तीची कामे मोठ्याप्रमाणात करण्यात आली. या कामात अनियमिता, बोगस, निकृष्ठ व अर्धवट कामे करण्यात आली आहेत. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करुन योगायती कार्यवाही करावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते मंगेश सुर्यवंशी लोकशाहीर मार्गाने दि. १८ जुन पासून उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करीत आहेत.



उदगीर तालुक्यात मागील वर्षभरात नालासरळीकरण व बंदारे दुरुस्तीची कामे करण्यात आली. या कामात मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार, अनियमिता, निकृष्ठ कामे व बरीच कामे अर्धवट झाला असून याकडे अधिकारी पद्धतशीर पणे दुर्लक्ष करीत आहेत. वेळोवेळी तक्रार करुन देखील चुकीच्या कामाला अभय देण्याचे काम मृदा व जलसंधारण विभागाचे अधिकारी नाईक करीत आहेत. त्याच्याच नियंत्रणात ही कामे झाली असल्यामुळे ते मुद्दाम आपल्या चुकीवर पांघरूण घालण्याचे काम होत आहे.

निकृष्ठ व बोगस कामाच्या विरोधात तक्रारी करुन देखील गुत्तेदारास मदत व्हावी व चुकीची कामे पुढे येवूनेय यासाठी उपविभागीय अधिकारी मृदा व जलसंधारण विभाग हे तक्रार कर्त्यास चुकीची माहिती व आमच्या विभागात कामेच झाली नसल्याचे सांगतात. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते मंगेश सुर्यवंशी हे गेल्या ११ दिवसांपासून उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करीत आहेत. या आंदोलनाची दखल न घेतल्यास लोकशाहीर मार्गाने विविध आंदोलन केले जाईल अशी माहिती सुर्यवंशी यांनी दिली आहे.

## सणसर मधील विविध युवकांनी वारकऱ्यांना खाऊ वाटप

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर गावात जगदगुरु संत तुकाराम महाराज पालखीचा मुक्काम शुक्रवार दि. 27 जून रोजी संध्याकाळी होता. त्याअनुषंगाने सणसर गावातील मुस्लिम बांधव सणसर सोसायटीचे माजी चेअरमन शब्बीर भाई काझी, युवा उदयोजक अक्षय भैय्या निंबाळकर मित्र परिवार,कैफ भैय्या तांबोळी मित्र परिवार, गणेश गवळी मित्र परिवार,



गणेश व रुपेश भोसले मित्र परिवार यांनी सणसर भवानीनगर परिसरात येणाऱ्या वारकऱ्यांची सेवा म्हणून विविध ठिकाणी फराळमिठाई,चहा,मसाला दुध,केळी,बिस्कीट,
पोहे,बिसलेरी पाणी वाटप करण्यात आले.यावेळी जवळपास सर्वांनी मिळून पंचवीस हजार वारकऱ्यांना याचा लाभ देण्यात आला असल्याची माहिती मिळाली आहे.

या वाटपाचे नियोजन करण्यासाठी शब्बीर काझी, आबासाहेब भोईटे,विक्रम भैय्या निंबाळकर,राहुल जगताप,राहुल पाटील,आबासाहेब निंबाळकर,
नितीन नाना निंबाळकर,इकबाल काझी,रवी निंबाळकर,अजिंक्य निंबाळकर,हमीद भाई तांबोळी,यासिन सय्यद,मुबारक सय्यद,अतिकभाई काझी,आदी सणसर गावातील युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रमजीवीचे ऐतिहासिक रास्ता रोको आंदोलनः

### भिवंडी-वाडा-मनोर आणि कामण-चिंचोटी रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात श्रमजीवी संघटनेचा १२ तासांचा लढा

महाराष्ट्र जीत

**ठाणे/पालघर, २६ जून २०२५:** भिवंडी–वाडा–मनोर आणि कामण–चिंचोटी–अंजूर फाटा या रस्त्यांच्या दयनीय अवस्थेविरोधात श्रमजीवी संघटनेने आज (२६ जून २०२५) सकाळी ११:३० वाजल्यापासून अंबाडी, कुडूस, डाकिवली फाटा, शिरीष पाडा, खंडेश्वरी नाका, नंदीठणे, कवाड, मालोडी आणि कामण या नऊ ठिकाणी एकाच वेळी रास्ता रोको आंदोलन पुकारले. तब्बल १२ तास चाललेले हे आंदोलन ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला भेडसावणाऱ्या रस्त्यांच्या समस्येवर प्रकाश टाकणारे ऐतिहासिक ठरले आहे. श्रमजीवी संघटनेच्या सभासदांसमवेत सामान्य नागरिक व्यापारी विद्यार्थीसुद्धा या आंदोलनात सहनही झालेले दिसले.

लोकशाहीच्या पवित्र सभागृहातील मागणी आणि ठेकेदारांवर कारवाई

या रस्त्यांच्या दुरवस्थेचा मुद्दा यापूर्वी १८ डिसेंबर २०२३ रोजी विधानपरिषद सभागृहात आमदार प्रवीण दरेकर यांनी उपस्थित केला होता. त्यावेळी तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी जिजाऊ कन्स्ट्रक्शन कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची घोषणा केली होती. श्रमजीवी संघटनेने या आंदोलनादरम्यान लोकशाहीच्या पवित्र सभागृहात दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्याची जोरदार











मागणी केली. संघटनेने उघड केले की, २०१९ पासून या रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी कोट्यवधी रुपये मंजूर होऊनही खड्डे न भरल्याने अनेक अपघात घडले. याबाबत अधीक्षक अभियंत्यांनी ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव शासनाला पाठवला असून, तो पुन्हा पाठवण्याचे आश्वासन दिले आहे.

धक्कादायक माहितीः ८१ मृत्यू श्रमजीवी संघटनेने यावेळी एक धक्कादायक माहिती समोर आणली की, २०२२ ते २०२५ या कालावधीत या महामार्गावरील खराब रस्त्यांमुळे तब्बल ८१ जणांचा मृत्यू झाला आहे. या मृत्यूंना जबाबदार ठेकेदारांवर कारवाईची मागणी संघटनेने लावून धरली.

**आंदोलनाची तीव्रता आणि अधिकाऱ्यांशी चर्चा**

श्रमजीवी संघटनेच्या कष्टकरी बांधवांनी आक्रमक पवित्रा घेत रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी लावून धरली. संध्याकाळी ४:३० वाजल्यापासून संघटनेचे शिष्टमंडळ आणि ठाणे व पालघर जिल्ह्यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे (PWD) अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, कार्यकारी अभियंता सचिन पाटील, वाडा उपविभागीय अधिकारी संदीप चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे पाटील, जव्हार उपविभागीय अधिकारी गणपत पिंगळे, भिवंडी तहसीलदार अभिजीत खोले, वाडा तहसीलदार भाऊसाहेब अंधारे आणि ठाणे ग्रामीण गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांच्यासह महसूल प्रशासनाच्या अधिकाऱ्यांशी सात तास जोरदार चर्चा झाली. संघटनेने अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे यांना रस्त्यावर आणून जनतेच्या प्रश्नांना उत्तरे देण्यास भाग पाडले.

**नेतृत्व आणि आश्वासने**

संघटनेचे राज्य उपाध्यक्ष दत्तात्रय कोलेकर, सरचिटणीस बाळाराम भाऊ, सरचिटणीस विजय भाऊ जाधव, जिल्हाध्यक्ष अशोक सापटे, पालघर जिल्हा अध्यक्ष सुरेश रेंजड, प्रवक्ते प्रमोद पवार, संघटक सचिव सिता घाटाळ, सुनील लोणे आणि पूजा माळी यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. आंदोलनाची दखल बांधकाम मंत्री आणि मुख्यमंत्री कार्यालयाने घेतली असून, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिंगारे यांच्यावर या प्रकरणाची चौकशी करून फौजदारी गुन्हे दाखल करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. नादुरुस्त रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी कृती आराखडा तयार करून उद्यापासून त्याची अंमलबजावणी सुरू होईल, असे लेखी आश्वासन देण्यात आले. यासह इतर मागण्यांवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर रात्री ११:३० वाजता हे आंदोलन संपवण्यात आले.

**संघटनेचे आवाहन**


श्रमजीवी संघटनेचे अध्यक्ष रामभाऊ वारणा यांच्या सूचनेनुसार, नऊ ठिकाणी सुरु असलेल्या आंदोलकांना आंदोलन समाप्त करून सुखरूप घरी परतण्याचे आवाहन करण्यात आले. संघटनेने या आंदोलनाला ऐतिहासिक आणि रेकॉर्डब्रेक ठरवत सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन आणि कौतुक केले आहे. भिवंडी – वाडा – मनोर रस्त्याच्या दुरावस्थेविरोधात श्रमजीवी संघटनेच्यावतीने करण्यात येत असलेल्या जन आंदोलनाला राष्ट्रवादी (अजितदादा) काँग्रेस पक्षाच्यावतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला. पाठिंब्याचे पत्र श्रमजीवीचे तालुका अध्यक्ष भरत जाधव यांना राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष जयेश शेलार यांनी सुपूर्त केले. वाडा तालुका पत्रकार संघाचा श्रमजीवीच्या आंदोलनाला सक्रिय पाठिंबा

# लेंडी बांधकामात ठेकेदारांचा करोडोंची उलाढाल, घोटाळायुक्त; चोरांचा सुळसुळाट,

मराठवाड्यातील आंतरराज्य प्रधान प्रकल्प मुखेड तालुक्यातील गोणेगाव येथे अंतिम टप्प्यात गळभरणी प्रगतीपथावर आहे, पुनर्वसन कामे प्रलंबित आहेत, मध्यंतरी मागच्या दहा वर्षात काम बंद अवस्थेत असताना, येथे बांधकाम मुख्य गेट, काँक्रीट कामासाठी शासनाचा करोडचा पैसा उडवण्यात आला, परंतु मध्यंतरी शासकीय अधिकाऱ्यासाठी बांधण्यात आलेले विश्रामगृहाच्या दुरावस्था, मुख्य शासकीय खोली बांधकाम साठी लाखो रुपयांचा खर्च करून घरगुती उपकरणे, अधिकाऱ्यावर खर्च, तसेच गेटच्या महागड्या वस्तू मागच्या दहा वर्षाखाली बरंच लंपास झाले, तरी शासन स्तरावर कोणतीच आतापर्यंत चौकशी झालेली नाही; याबाबत उच्चस्तरीय चौकशी व्हावी ,अशी गेल्या अनेक वर्षापासून जागरूक धरणग्रस्त बांधवांची मागणी आहे, तरी प्रशासन गांभीर्याने दखल घेत नाही. शासनाचे मालमत्ता आहे तिला कोणी वाली नाही' कितीही खर्च करा, काही चोरीला गेले तर त्यामुळे कोणी मनावर घेत नाही , परंतु लेंडी बांधकामात करोडोच्या खर्च तफावत दिसून आल्याचे छत्रपती संभाजी नगर डिव्हिजन लेंडी विभाग मध्ये बोलले जात आहे,ती शासनाची मालमत्ता म्हणजे ,खऱ्या अर्थाने सर्वसामान्य जनतेचा पैसा आहे, कारण शासन म्हणजे जनतेतून निर्माण झालेली व्यवस्था, जशी धरणाच्या कामाला गती देऊन ठेकेदारांना पैशाचा पाऊस पडत आहे, परंतु प्रलंबित धरणग्रस्त साठी आता पर्यंत, वाढीव कुटुंब पुनर्वसन अनुदान , सध्याचे सानुग्रह शेतकरी अनुदान वाटप सुरू आहे, तुरळक पुनर्वसन ठिकाणी सोई सुविधा शासनाकडून तात्पुरती पुनर्वसन व्यवस्था म्हणून पुनर्वशी ठिकाणी तात्पुरत्या शेड मारल्या जात आहे, त्याच्यात पण लाखोच्या भ्रष्टाचार मागे बातमी प्रकाशित झाले, परंतु त्यावरील प्रशासन ठोस पावले उचलायला तयार नाही, शासनाच्या निदर्शनानुसार आधी पुनर्वसन नंतर धरण असे ठरले होते ,परंतु प्रशासनाने धरणबांधकामांमध्ये वाजवी देगलूर उपविभाग जलसंपदा विभाग व प्रशासन खर्च आतापर्यंत केलेला आहे, त्यामुळे शासनाचा आढावा निधी बहुतांश बांधकाम कामासाठी वापरण्यात आला, परंतु तसे विचार केले तर धरणग्रस्तसाठी त्याचा खर्च मानावा तेवढा झालेला नाही आतापर्यंत धरणग्रस्त नागरिकांमध्ये प्रशासनाविरुद्ध निराशाजनक चर्चा पहावयास मिळत आहे.

**लेंडी धरणग्रस्तांची मागणी**

आहे, काम अंतिम टप्प्यात आहे परंतु ज्याप्रमाणे शासनाचा बहुतांश निधी बांधकाम ठेकेदार, शेड ठेकेदार, व इतर ठेकेदारांना वाजवी प्रमाणात देण्यात आला ,तसा सर समन्वय धरणग्रस्तांना पुनर्वसनाबाबत, सुशिक्षित बेरोजगार भत्ता, सोयी सुविधा स्थलांतर ,शासकीय विविध मागण्याबाबत खालच्या दर्जाचा निराशा व्यवहार प्रशासनाकडून दिसून आल्याचे धरणग्रस्तांकडून बोलले जात आहे.



# महात्मा ज्योतिबा फुले शाळेचे अनेक विद्यार्थी डॉक्टर्स , इंजिनियर्स पदावर

**किनवट प्रतिनिधी**
**विशाल भालेराव**
**किनवट :**

सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव असलेल्या या शाळेचे अनेक विद्यार्थी डॉक्टर्स , इंजिनियर्स तर झालेच ; तसेच इस्त्रो फळमध्ये शास्त्रज्ञ म्हणूनही काम करताहेत , ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. अशाच प्रकारे गुणवंत विद्यार्थ्यांनी आपलं उज्ज्वल भवितव्य निवडून देशपातळीवर विविध क्षेत्रात आपलं नाव गाजवावे , असे प्रतिपादन आमदार भीमराव केराम यांनी केले. येथून जवळच असलेल्या गोकुंदा येथील महात्मा ज्योतिबा फुले आणि मातोश्री कमलताई ठमके विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने शनिवारी (दि.28 ) गोपीकिशन मंगल कार्यालयात आयोजित राजर्षी शाहू महाराज जयंती सामाजिक न्याय दिन व गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना ते बोलत होते. याप्रसंगी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी जेनित चंद्रा दोन्तुला , राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे वरिष्ठ अन्वेषक गोवर्धन मुंडे , एन.सी. सी. 52 महाराष्ट्र बटालियनचे कमांडिग आफिसर कर्नल के. दिलीप रेड्डी , गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामने , माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार , सुनील पाटील , माजी उपनगराध्यक्ष श्रीनिवास नेम्माणीवार , हदगावचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय मुरमुरे , केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे , पत्रकार गोकुळ भवरे , शकीलोद्दीन बडगुजर , संस्थेचे सचिव अभियंता प्रशांत ठमके , कोषाध्यक्षा प्राचार्या शुभांगीताई ठमके यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य प्रमोद मुनेश्वर यांनी प्रास्तविक व पर्यवेक्षक संतोष बैसठाकूर यांनी सूत्रसंचालन केले. सुबोध सर्पे यांनी आभार मानले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महानायकांच्या प्रतिमेचे पुष्पपुजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. संगीताध्यापक कृष्णा कसबे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर केले.




प्रकल्प कार्यालयाच्या नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश या योजनेतून एम.के.टी. इंग्लिश स्कूल मधील तालुक्यातून प्रथम आलेली आदिती अशोक ढगे , नीट मधील यशवंत सुयश प्रशांत ठमके , रामदास सुदाम जायभाये , संकल्प प्रवीण वाघमारे , जे.ई.ई. मधील यशवंत आय.आय.टी. वाराणशी प्रविष्ठ भूपेश विनोद राठोड व एन. आय.टी. नागपूर प्रविष्ठ आयुष नागसेन पाटील यांच्यासह इयत्ता 10 वी , 12 वी परिक्षेत विशेष प्राविण्य घेणारे , काही विषयांत पैकीच्या पैकी गुण घेणारे , देश पातळीवरील विविध स्पर्धा परिक्षांमध्ये यशवंत ठरलेल्या या शाळेतील विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकासह शाल , पुष्पगुच्छ व भेट वस्तू देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी जेनित चंद्रा दोन्तुला , कर्नल के. दिलीप रेड्डी , गट शिक्षणाधिकारी अनिलकुमार महामुने व केंद्र प्रमुख उत्तम कानिंदे यांनी विद्यार्थ्यांना भावी भवितव्या बद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उप प्राचार्य राधेश्याम जाधव, उप मुख्याध्यापक किशोर डांगे, पर्यवेक्षक रघुनाथ इंगळे, मनोज भोयर यांचे सह सर्व शिक्षक , शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. " आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आलं आहे. यानुसार विद्यार्थ्यांनी पाठयपुस्तका व्यतिरिक्त अवांतर ज्ञान ग्रहण करावे. अभ्यासक्रमात दर्शविलेल्या उदाहरणानुरूप प्रत्यक्ष जीवनातील समस्यांची कशी सोडवणूक करता येईल हे ठरवून आपलं करिअर निवडा व यशस्वी व्हा . -जेनित चंद्रा दोन्तुला, सहा. जिल्हाधिकारी तथा प्रकल्पाधिकारी , किनवट " " विद्यार्थ्यांनी मेंदुला चालना देणाऱ्या बुध्दिबळ या देशी खेळाचा व जपानी कायझेन तत्वज्ञानाचा दैनंदिन जीवनात वापर करून कोणत्याही अवघड बाबींचा जास्तीत जास्त सराव करून यश संपादन करावे.
**-अनिलकुमार महामुने , गट शिक्षणाधिकारी, किनवट**

## बनुया एकमेका आधार

निसर्ग पोसतो साऱ्या सृष्टीला
करत नाही कधी भेदभाव रे
जातीपातीच्या जाळ्यात गुंतला
मनी माणुसकीचा अभाव रे

धरती बीज अंकुरे उदरात बघ
आकाश छत्र ही सर्वांचे एक
उच निचतेच्या तुलनेत माणसा
दूषित केला बंधुभाव विवेक

नद्या वाहती शीतल खळखळ
किंचित न तयांना मान अपमान
नाही विचारत जात पात कुणा
तहानलेल्याची भागवी तहान

तव भूक शमवते पेटून अग्नी ती
चंद्र,सूर्य उगवता दिनचक्र चालते
निर्माता अन् संहारक एक निसर्ग
ज्या शक्तीने धरा डौलात डोलते

बोध घेऊनी आज साऱ्यांचा
करूया आपण एकच निर्धार
मनी साठवून प्रेम अन् नम्रता
बनुया सारे एकमेका आधार

# मोदिजींच्या मन की बात द्वारे थेट संवाद करंजाडे वाशीयांशी..

### करंजाडेत तब्बल अकरा ठिकाणी होणार "मन की बात" थेट प्रसारण

### भाजप माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

माननीय नरेंद्र मोदी हे पंतप्रधान झाल्यापासून प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी देशवासियांना उद्देशून "मन की बात" मधुन संवाद साधतात. या कार्यक्रमाचे कौतुक संपूर्ण जगभर होते आहे. तसेच ११ वर्षे राष्ट्र सेवेची, समर्पणाची, सुशासनाची मा. पंतप्रधान मोदिजींच्या 'मन की बात' द्वारे थेट संवाद रविवार दिनांक २९ जून रोजी सकाळी ११ वाजता भारतीयांशी साधणार आहेत. त्या निमित्ताने मन की बात या कार्यक्रमाचे ११ ठिकाणी थेट प्रसारण करंजाडे वासियांसाठी करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भाजप युवा नेते रामेश्वर आंग्रे यांनी आयोजित केले आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी,




माजी नगराध्यक्ष भाजप नेते जे.एम म्हात्रे, माजी विरोधीपक्षनेते भाजप नेते प्रितम म्हात्रे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक गणेश कडू यांच्या मार्गदर्शनाखाली करंजाडे वसाहतीत अकरा ठिकाणी मन की बात या कार्यक्रमाचे जाहीर प्रसारण करण्यात येणार आहे. त्यामुळे करंजाडे वसाहतीतील सर्व नागरिकांनी या मन की बात कार्यक्रमाच्या प्रसारणात सहभागी व्हावे असे आवाहन भाजप माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी केले आहे.

**या ठिकाणी होणार थेट प्रसारण...**

1. भारतीय जनता पार्टी कार्यालय से. ३, करंजाडे
२. साई दिप रेसिडेन्सी, प्लॉट नं. १२, से. ३, करंजाडे
३. रत्नेश्वर व्हिव, प्लॉट नं. १११, से. ३, करंजाडे
४. जेष्ठ नागरीक सामाजिक संस्था कार्यालय से. ४, करंजाडे
५. कलश रेसिडेन्सी, प्लॉट नं. १०, से.४, करंजाडे
६. पल्लवी डान्स ॲकडमी, प्लॉट नं. १४३, से. ४, करंजाडे
७. श्री. रामेश्वर आंग्रे जनसंपर्क कार्यालय से. ५, करंजाडे
८. श्री स्वामी समर्थ कृपा सी.एच.एस., से. ५, करंजाडे
९. गावदेवी गणेशोत्सव मंडळ से. ६, करंजाडे
१०. एस. जी. इंटरनॅशनल स्कुल, बौद्ध विहार वडघर
११. गणेश नगर, गणेश मंदिर सभा मंडप

## आंबोली ग्रामपंचायत मध्ये उपसरपंच पदी कैलास शिंदे यांची बिनविरोध निवड

दैनिक युवक आधार
डॉ. देवेंद्र ओव्हाळ
खेड पुणे



आंबोली ग्रामपंचायत च्या उप सरपंच पदी कैलासराव नामदेव शिंदे यांची बिनविरोध निवड या वेळी बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते आंबोली वी.का.सोसायटीचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे ,कृषी उत्पन्न बाजार समिती च्या माजी उपसभापती सुगंधाताई शिंदे माजी सरपंच सुदान दादा शिंदे धर्मवीर संभाजी राजे युवा मंच चे अध्यक्ष निलेश राव शिंदे स्वप्नील शेट खुतवड प्रविण भाऊ वायकर संस्थापक व त्यांचे सर्व सहकारी माजी सरपंच उल्लास राव शिंदे माजी सरपंच संजय कोकण शिक्षण सोसायटीचे सभापतीय अविनाश शिंदे गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष कैलास शिंदे विद्यमान सरपंच तृप्ती शिंदे सदस्य कैलास राव लक्ष्मण शिंदे दत्ता सुतार माजी सरपंच नाकुशाताई शिंदे शिल्पा ताई कोकण पुष्पा ताई मोहन माजी सरपंच विजय खंडागळे लक्ष्मण अण्णा शिंदे मोहन शिंदे सहदेव शिंदे पोलीस पाटील रांजणाताई पिचड जयसिंग शिंदे माजी उपसरपंच कचराबाई शिंदे अमर काळडोके संतोष शिंदे रमेश शिंदे नितीन शिंदे लहू शिंदे हिरामण अण्णा शिंदे माजी चेअरमन कचरुशेठ शिंदे माजी सरपंच संतोष शेठ काळडोके विशाल शिंदे मच्छिंद्र शिंदे व बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते जिल्हा परिषद माजी सदस्य अतुल भाऊ देशमुख यांनी नवनिर्वाचित सरपंचांना शुभेच्छा दिल्या तर सुदामदादा शिंदे यांनी प्रास्ताविक केले व बाळासाहेब शिंदे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले